कार्यालय–सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण, गोंदिया
दिनांक २९५६
१६/०८/२०१९
सामान्य



RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ८६(२)] गुरुवार, ऑगस्ट १, २०१९/श्रावण १०, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १९२**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई ४०००३२, दिनांक ३१ जुलै, २०१९

**अधिसूचना**

**हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन याबाबत अधिनियम, २०१३.**

क्रमांक हामेंऊ २०१८/प्र.क्र.३५२ (भाग-२)/अजाक.—ज्याअर्थी केंद्र शासनाच्या, हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन याबाबत अधिनियम, २०१३ (२०१३ चा २५) च्या कलम २४(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ खालील सदस्यांचा समावेश असलेल्या जिल्हास्तर व उप विभागीय स्तरावर दक्षता समिती गठित करत आहे :–

| | | |
|---|---|---|
| (१) | जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी | पदसिद्ध अध्यक्ष |
| (२) | जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील विधीमंडळाचे सर्व सदस्य परंतु जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीचा सदस्य नसल्यास राज्य शासन त्या जिल्ह्यातील अन्य विधीमंडळ सदस्याचे नामनिर्देशन करु शकेल. मात्र, ही संख्या दोन पेक्षा अधिक नसेल | सदस्य |
| (३) | जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक | पदसिद्ध सदस्य |
| (४) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | पदसिद्ध सदस्य |
| (५) | जिल्हा मुख्यालयातील नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचे आयुक्त | पदसिद्ध सदस्य |
| (६) | जिल्ह्यातील कटक मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| (७) | रेल्वे प्राधिकरणाने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी | सदस्य |
| (८) | हाताने मैला साफ करण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे या क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था अथवा समाजाचे प्रतिनिधीत्व करत असणारे त्या जिल्ह्यातील रहिवासी अशा ४ व्यक्तींचे नामनिर्देशन जिल्हाधिकारी करतील, त्यापैकी २ महिला असतील. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| (९) | जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेले जिल्ह्यातील वित्तीय व पतसंस्थांचे प्रतिनिधीत्व करणारी १ व्यक्ती. | सदस्य |
| (१०) | संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण | पदसिद्ध सदस्य स... |
| (११) | जिल्हाधिकारी यांच्या मतानुसार जिल्हास्तरावरील इतर विभागांचे प्रमुख जे या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतील असे जिल्हास्तरावरील संबंधित विभागाचे जिल्हाप्रमुख. | पदसिद्ध सदस्य |

उप विभागीयस्तरावरील दक्षता समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :—

| | | |
|---|---|---|
| (१) | उप विभागीय दंडाधिकारी/उप विभागीय अधिकारी (महसूल) | पदसिद्ध अध्यक्ष |
| (२) | उप विभागीय मुख्यालयाचे सभापती, पंचायत समिती | पदसिद्ध सदस्य |
| (३) | उप विभागीय मुख्यालयातील पंचायत समितीचे गट विकास अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| (४) | उप विभागीय पोलीस अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| (५) | उप विभागीय मुख्यालयातील नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा आयुक्त महानगरपालिका | पदसिद्ध सदस्य |
| (६) | उप विभागातील कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी | पदसिद्ध सदस्य |
| (७) | उप विभागातील रेल्वे प्राधिकरणाने नामनिर्देशित केलेला १ प्रतिनिधी | पदसिद्ध सदस्य |
| (८) | उप विभागात निवास असलेल्या जे हाताने मैला उचलण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे या क्षेत्रात काम करणारे समाजसेवक अथवा या समाजातील प्रतिनिधी यांची संख्या २ इतकी असेल त्यापैकी एक महिला असेल. | सदस्य |
| (९) | उप विभागीय अधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला उपविभागातील वित्तिय व पतसंस्था यांचा एक प्रतिनिधी. | सदस्य |
| (१०) | उप आयुक्त, समाजकल्याण नामनिर्देशित करतील असे समाजकल्याण अधिकारी (वर्ग-२)/ वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक. | पदसिद्ध सचिव... |
| (११) | उप विभागीय अधिकारी यांच्या मतानुसार उप विभागातील उप विभागीयस्तरावरील जे अधिनियमाच्या अंमलबजावणी मध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतील. | पदसिद्ध सदस्य |

२. जिल्हा व उप विभागीयस्तरावरील दक्षता समितीची बैठक तीन महिन्यांत कमीत कमी एक वेळा तरी व्हावी.

३. जिल्हा व उप विभागीयस्तरावरील समितीचे कार्यवृत्त केवळ उपरोक्त समितीच्या रचनेतील त्रुटीमुळे निरर्थ ठरणार नाही.

४. जिल्हा व उप विभागीयस्तरावरील दक्षता समितीचे कार्य खालीलप्रमाणे असेल :—

(१) उक्त अधिनियम, २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करावयाच्या कार्यवाही संदर्भात जिल्हाधिकारी व उप... दंडाधिकारी यांना सल्ला देणे.

(२) मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स यांचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन यावर देखरेख करणे.

(३) मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या पुनर्वसनाकरिता कार्यरत संबंधित यंत्रणांच्या कार्याचा समन्वय साधणे.

(४) उक्त अधिनियम, २०१३ च्या अनुषंगाने घडणाऱ्या गुन्ह्यांची नोंद घेऊन त्यांचा तपास आणि अभियोजनावर संनियंत्रण...

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दिनेश वाघमारे,
शासनाचे प्रधान सचिव.